# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- १४/०९/२०१७

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे मोहन लक्ष्मण राठोड, वय २५ वर्षे, रा. स.नं. १२, सुंदरनगर मांगडेवाडी कात्रज पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक १६/२०१८ दिनांक १४/०९/२०१८ रोजी एक वर्षाकरीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम घरफोडी, सामाईक इरादा, दरोडा तयारी, जाळपोळ, जखमी करुन जबरी चोरी वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द सांगवी आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास श्री बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन एक वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.